# दि खामगांव अर्बन को-ऑप.बँक लि., खामगांव

**(मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक) रजि.नं.MSCS/CR/107/2000**

**मुख्य कार्यालय :- धनवर्धिनी, श्रीराम शालीग्राम प्लॉट्स,खामगांव, ता.खामगांव जि.बुलडाणा (महाराष्ट्र) - ४४४ ३०३**

## ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

## सभासदांना आमसभेची सूचना

दि खामगांव अर्बन को-ऑप.बँक लि., खामगांव बँकेची ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि.३०/०७/२०२५ बुधवार रोजी दुपारी ठिक ०४.०० वाजता श्री.कोल्हटकर स्मारक मंदीर, खामगांव, ता.खामगांव जि.बुलढाणा (महाराष्ट्र) या ठिकाणी आयोजीत केली आहे. तरी सदर सभेस सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१) दिनांक २७/०६/२०२४ रोजी झालेल्या ६१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) मा.संचालक मंडळाने सादर केलेला दि.३१/०३/२०२५ अखेरचा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक स्विकृत करणे.
३) मा.संचालक मंडळाने सुचविलेल्या वर्ष २०२४-२५ च्या नफा वाटणीस मंजुरी देणे. तसेच लाभांश जाहीर करणे.
४) मा.संचालक मंडळाने शिफारस केलेल्या वर्ष २०२५-२६ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
५) मा.संचालक मंडळाने ठरविलेल्या व्यवसाय नियोजनास (Business Plan) मान्यता देणे.
६) मा.वैधानिक लेखापरिक्षकांच्या २०२४-२५ वर्षाच्या अहवालाची नोंद घेणे व दोष दुरुस्ती अहवाल संमत करणे.
७) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता मा.वैधानीक लेखा परिक्षकांच्या नियुक्ती बाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेस पाठविण्यात आला असून, त्यास कार्योत्तर मंजुरात देणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
८) वसुलीचे हक्क कायम ठेवून मा. वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेल्या संशयीत व बुडीत कर्ज खात्यांचे निर्लेखन करणे.
९) दि मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज् ॲक्ट २००२ चे कलम ३९(३) नुसार अहवाल वर्षात मा.संचालक व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची व त्यांचे येणे बाकीची २०२४-२५ या वर्षाची माहिती घेणे.
१०) विद्यमान मा. संचालक यांचे नातेवाईक बँकेच्या सेवेत असल्यास त्याची माहीती देणे.
११) आर्थिक वर्ष २०२४-२५ यामध्ये पुनर्लिखित केलेल्या कर्जाची माहिती घेणे.
१२) आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये बाहेरुन उभारावयाच्या निधीची मर्यादा ठरविणे.
१३) मा.संचालक मंडळाने बँकेच्या उपविधी (Bye-Laws) मध्ये सुचविलेल्या दुरुस्तीस मान्यता देणे.
१४) ६२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू न शकलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे व त्यास मान्यता देणे.
१५) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

**मा.संचालक मंडळाचे आदेशावरुन**

नोंदणीकृत कार्यालय
**दि खामगांव अर्बन को-ऑप.बँक लि.,खामगांव.**
श्रीराम शालीग्राम प्लॉटस्, खामगांव, ता.खामगांव जि.बुलडाणा - ४४४ ३०३
दि.०८/०७/२०२५

**ज्ञानेश्वर भी. जाधव**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**सभासदांना महत्वाच्या सुचना**

१. दुपारी ०४.०० वाजता गणपूर्ती न झाल्यास सभा स्थगित केली जाईल व स्थगित झालेली सभा त्याच ठिकाणी त्याच दिवशी दुपारी ०४.३० वाजता घेण्यात येईल.त्या सभेस गणपूर्तीची व वेगळ्या सूचनेची आवश्यकता नाही.
२. बँकेचे ताळेबंद, नफा तोटा पत्रकाबाबत सभासदांना काही सूचना द्यावयाच्या असल्यास कृपया दि.१६/०७/२०२५ पर्यंत मुख्य कार्यालयात लेखी स्वरुपात द्याव्यात.
३. ३१ मार्च २०२४ या वर्षाचा लाभांश आपल्या बँकेच्या खात्यात जमा करण्यात आला आहे. लाभांशाची रक्कम जमा झाल्याची खात्री करुन घ्यावी. ज्या सभासदांचे आपले बँकेत बचत खाते नसेल, त्यांनी ते त्वरीत नजीकच्या शाखेत उघडून घ्यावे व लाभांशाची रक्कम खात्यात जमा करण्यासंबंधीचा अर्ज त्या शाखेच्या शाखाधिकारी यांना द्यावा.
४. सभासदांनी नांव, पत्ता अथवा वारसदार यांचे मध्ये बदल झाला असल्यास त्यांनी मुख्य कार्यालयातील शेअर्स विभाग येथे किंवा आपल्या जवळील शाखेमार्फत तशी नोंद करुन घ्यावी.
५. वार्षिक अहवाल बँकेच्या वेबसाईट ( www.khamgaonbank.in) वर देखील उपलब्ध असेल.